केंद्र शासनाच्या " **स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण )**"
कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता प्राप्त
केंद्रीय सहाय्य वितरीत करण्याबाबत. **( २२१५ ९८६२ )**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- बीयुडी-२०१७ / प्र.क्र. ०६ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०९-०३-२०१८

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०. ०६.२०१७ व ०६/०२/२०१८
४) केंद्र शासन, पेय जल व स्वच्छता मंत्रालय यांचे क्र. S.12011 / 7 / 2015 - SBM, दि.१३-१०-२०१७.
५) समक्रमांकीत शासन निर्णय दि. - २७/०६/२०१७ व १४/११/२०१७
६) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची नस्ती क्र.स्वभामि- २०१७ / प्र.क्र. ८१ /पा.पु.१६.

**शासन निर्णय :-**

आदिवासी उपयोजनांतर्गत मागणी क्र.टी-५, २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता, जनजाती क्षेत्र उपयोजना, जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) जलनिस्सारण व स्वच्छता, ७९६, जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०३) स्वच्छ भारत अभियानांतर्गत वैयक्तिक स्वच्छालय बांधणे २२१५ ९८६२ मधील ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षात रु.३०२९१.५० लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे यापैकी संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयांन्वये एकुण रु.६४९२.०२ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाने वाचा क्र. ४ येथील पत्रान्वये उपरोक्त योजनेंतर्गत रु.६६०७.२६ लाख इतका तिसरा हप्ता वितरीत केलेला आहे. त्यानुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने वाचा क्र. ४ येथील नस्तीवर प्रस्तावित केल्यानुसार स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण ) कार्यक्रमांतर्गत (०१) (०३) स्वच्छ भारत अभियानांतर्गत वैयक्तिक स्वच्छालय बांधणे, २२१५ ९८६२, ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता **रु.६६०७.२६ लाख (अक्षरी रुपये सहासष्ठ कोटी सात लाख सव्वीस हजार फक्त )** इतका निधी या योजनेचे नियंत्रक अधिकारी तथा अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना खर्चासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्र व क्षेत्राबाहेरील मान्य योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी <u>मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च</u> करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची

दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१, २ व ३ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ७२/ अर्थोपाय, दि. १७/०२/२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून वरील शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803091105080724 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.14 17:08:51 +05'30'

( रविंद्र औटे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
०९. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (पापु-१६) मंत्रालय, मुंबई
११. कक्ष अधिकारी, कार्यासन-१७, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.